पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८.

माध्यमिक शिक्षण विभाग

एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात नेमणुका करणेबाबत.

---

जाहिरात क्र. ३                                                  दिनांक :- ८/१०/२०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत् संगीत अकादमी स्थापन करण्यात आलेली आहे. सदर संगीत अकादमी मध्ये विद्यार्थ्यांना हार्मोनियम वादन, तबला, शास्त्रीय गायन, सुगम गायन असे विविध प्रकारचे संगीत अध्यापन केले जाते, सदर अध्यापनाकामी १ संगीत शिक्षका यांची ६ महिने मुदतीकरिता करार पध्दतीने एकत्रित मानधनावर नेमणूक करण्यात येणार आहे. त्याकरिता खालील प्रमाणे शैक्षणीक पात्रता अटी दिलेल्या आहेत.

| अ. क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता | पदाची संख्या | एकत्रित दरमहा मानधन | इतर अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | संगीत शिक्षक | मान्यताप्राप्त विद्यापीठाची संगीत विषयात पदवी (B. A. Music) किंवा मान्यता प्राप्त अ. भा. गं. अ. ची संगीत विशारद पुर्ण परीक्षा उत्तीर्ण | ०१ | १०,०००/- | इतरत्र कोणत्याही ठिकाणी संगीत शिक्षकाचे कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य |

अटी व शर्ती –

१) ज्या पदाकरिता अर्ज केलेला त्या पदाचे नाव ठळक अक्षरात पाकिटावर लिहावे.

२) शैक्षणिक अर्हता वरीलप्रमाणे राहील.

३) सदरचे पद हे करार पदध्दतीने एकत्रीत मानधनावर आहे.

४) मानधनावरील नेमणूक ही ६ महिने कालावधीकरिता हंगामी स्वरुपाची आहे. त्यामुळे अर्जदास कोणत्याही कायमपदी नेमणूकीचा हक्क राहणार नाही.

५) मूळ सहा महिने नियुक्तीनंतर नियमानुसार मुदतवाढीसाठी उमेदवाराचा हक्क राहणार नाही.

६) यापूर्वी संगीत अकादमी निगडी येथे मानधनावर कामकाज केलेल्या उमेदवारांनी पुनश्च: अर्ज करु नये त्यांचा विचार निवडीसाठी करणेत येणार नाही.

७) निवड होणा-या संगीत शिक्षकाने महानगरपालिकेशी ६ महिन्यांचा करार करणे आवश्यक आहे.

८) ज्या दिवशी महानगरपालिकेला सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय त्याची मानधनावरील सेवा संपुष्टात आण्ययात येईल.

९) मुलाखतीस येण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही.

१०) पात्र व निवड झालेल्या उमेदवारास उपरोक्त नमूद केलेप्रमाणे एकत्रीत मानधना व्यतिरिक्त इतर सोयी सुविधा हक्क व आर्थीक लाभ देय राहणार नाहीत.

११) उमेदवाराने आपल्या अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, गुणपत्राक प्रमाणपत्र व अनुभव इत्यादी कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराकडे विशेष प्राविण्य असल्यास त्याबाबतही वेगळा तपशील सादर करावा.

१२) उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहित नमुन्यात पासपोर्ट आकाराच्या फोटोसहित अर्ज करावा. माध्यमिक शिक्षण विभागातील पदासाठी अर्ज मा. शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८ या नावाने करावा, सदरचा अर्ज दिनांक २९/१०/२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वरील पत्यावर रजिस्टर पोष्टाने पोहोचतील अशा बेताने पाठवावेत. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार कोणत्याही परिस्थितीत करण्यात येणार नाही. पोष्टाने पाठविलेले अर्ज गहाळ झाल्यास अथवा विलंब झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. विहित नमुन्यात नसलेले तसेच कागदपत्रा अपूर्ण असलेले व वेळेत प्राप्त न झालेल्या अर्जांचा विचार करणेत येणार नाही. सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना मनपाच्या या संकेतस्थळावर पाहता येईल. निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. मुलाखतीकरिता अलाहिदा कळविणेत येईल.

अतिरिक्त आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी, पुणे – ४११ ०१८

माध्यमिक शिक्षण विभाग

क्र. माध्य/शि/संअ/कावि/१२८/२०१८

दि. ८/१०/२०१८

शिक्षणाधिकारी

माध्यमिक शिक्षण विभाग

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना**

४९८

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

विषय – सन २०१८-१९ या वर्षाकरीता एकत्रीत मानधनावर संगीत शिक्षक नेमणुकीबाबत...
संदर्भ – दि. /०८/२०१८ महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द झालेली
जाहिरात क्रमांक /२०१८.

महोदय,

संदर्भीय जाहिरातीनुसार मी एकत्रीत मानधनावर संगीत शिक्षक (हार्मोनियम ) या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करीत असून या पदासाठी निवड होण्याकरीता विहीत नमुन्यातील अर्ज करीत आहे.

आडनांव स्वत:चे नांव वडील / पतीचे नांव

१) संपूर्ण नांव
२) पत्रव्यवहार पत्ता पिनकोडसह - ----------------------------------------------------------------------------------------

३) जन्मतारीख - / /
४) लिंग - - स्त्री / पुरुष
५) जात - -
६) मोबाईल नंबर -

| अ.क्र. | शैक्षणीक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | एस. एस. सी. | | | |
| २ | एच. एस. सी. | | | |
| ३ | पदवी | | | |
| ४ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची B. A. (संगीत) पदवी किंवा अ. भा. गं. महाविद्यालयाची ची संगीत विशारद पुणे परीक्षा उत्तीर्ण | | | |

अनुभव – किमान एक वर्ष संगीत शिक्षक पदाचा अनुभव ( हार्मोनियम ) आवश्यक.

वर नमूद केलेला तपशिल खरा व बरोबर असून त्याबाबत आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे मानधनावरील नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहीन तसेच माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

अर्जदाराची स्वाक्षरी

ठिकाण –

दिनांक -